मजकुर :-

दिनांक ०६/११/२०२६ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **"Best Detection of the Month"** **माहे ऑक्टोबर २०२६** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणे/शाखा यांची निवड करण्यात आलेली आहे.

(अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोबर २०२६ - ०२ गुन्हे

०१	**कक्ष २, गुप्रशा., गुअवि.,** प्रकटीकरण, मुंबई	**गु.र.क्र.** १४३/२०२६ कलम १०९(१), ६१(२)३(५) १११, २३८ भा.न्या.सं.सह कलम ३,२५,२७ शस्त्र अधिनियम ३७ (१) (अ), १३५ मपोका, सह कलम ३(१) (ii), ३(२), ३(४), एम. सी.ओ.सी.ॲक्ट.

-:" खुणाचा प्रयत्न (अग्निशस्त्राच्या सहाय्याने) ":-

नमुद गुन्हयात फि' हे नरसी इंटरनॅशल शाळेच्या प्ले ग्राउंडच्या पुष्पा नरसी पार्कच्या दिशेला असलेल्या गेटच्या बाजूला सार्वजनिक शौचालया समोरील रस्त्यावरुन बी.एम.डब्ल्यु गाडीतून परत जात असताना, अटक आरोपीतांपैकी दोघांनी गाडीच्या समोरुन व डाव्या बाजूने, अभिनेता टायगर श्रॉफ व फि' यांच्यावर गोळया झाडून जीवे मारण्याचा हल्ला करुन गंभीर जखमी केले तसेच सदर हल्यामध्ये रस्त्यावरील एक इसम देखील जखमी झाला. त्यानंतर ते तिघेही पिवळया रंगाच्या मो/सायकलवरुन निघून गेले म्हणून गुन्हा नोंद.

फिर्यादी नाव/वय	:-	फिरदोस इब्राहीम बलोच
हस्तगत मालमत्ता	:-	रक्ताचे डागाचे नमुने / माती मिश्रीत रक्ताचे नमुने / रिकामी ०४ बुलेट पुगंळी / जिवंत ०१ बुलेट
आरोपी अटक नाव/वय	:-	१)फूलसिंग नरेश सिंह वय १९ वर्षे २)ऋतिककुमार रामू महतो उर्फ रोशन वय २२वर्षे ३) रेहान रिशीउद्दीन अन्सारी वय १८ वर्षे
अटक दिनांक	**:-**	**१९/१०/२०२६**
गुन्हा कोणी उघडकीस आणला	:-	पेनि. भरत दिनकर घोणे व पथक

मालमत्ता हस्तगत करणेकरीता केलेली कामगिरी- दि. १८/१०/२०२६ रोजी १९.१५ च्या सुमारास प्रपोनि यांना दूरध्वनी व्दारे माहिती मिळाली की अभिनेता टायगर श्रॉफ यांच्या गाडीवर तीन अज्ञात इसमांनी गोळीबार केला असुन सदरचे इसम हे बाईक वर बसून पळून केल्याबाबत सांगितले . त्याअनुषंगाने मा. वरिष्ठांच्या आदेशाने कक्ष ९ कडून पोलीस पथके नेमण्यात आली. पोलीस पथकाने घटनास्थळाच्या आजुबाजुच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासली असता, सदर तीन अज्ञात इसम हे पिवळया रंगाच्या मोटार सायकल वरुन अंधेरी स्टेशनच्या दिशेने गेल्याचे दिसून आले. त्यावरुन अंधेरी रेल्वे स्टेशन परीसरात जावून सदर मो/सा चा शोध घेतला असता, सदर मो/सा अंधेरी रेल्वे स्टेशन परीसरात पार्क केलेली मिळून आली. सदर मो/सा चा आरटीओ रजिस्ट्रेशन क्रमांक प्राप्त करुन त्याआधारे मुळ मो/सा मालकाचे नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक शोध घेतला असता तो मेघवाडी पोलीस ठाणे हददीतील असल्याचा आढळून आला. त्यामुळे सदर पत्त्यावर जाउन चौकशी केली असता, मूळ मो/सा मालकाचे आई-वडील मिळून आल्याने त्यांना सदर गाडीबाबत विचारणा केली असता, त्यांच्या मुलाने सदरची गाडी ही २०२२ साली OLX APP वरुन विकली असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस पथकाने सदर गाडीवर २०२२ ते अदयापर्यत ई चलन कारवाई झाली आहे का ? हे ई चलन मिशनव्दारे तपासले असता पोलीस पथकास असे समजले की, सन २०२३ साली गाडीवर केलेल्या कारवाईचा ई चलन दंड हा २०२५ साली भरलेला दिसून आला. त्याअनुषंगाने ज्या व्यक्तीने तो ई चलन दंड भरलेला होता, त्याचा फोटो व मोबाईल क्रंमाक मिळून आला. मोबाईल क्रंमाकाच्या आधारे सदर व्यक्तीचा पत्ता शोधला असता, तो दिंडोशी परिसरातील होता. पोलीस पथक तात्काळ सदर पत्त्यावर गेले असता, पोलीस पथकास ई चलन दंड भरलेल्या व्यक्तीचे वडील व भाऊ मिळून आले. त्यांना सदर मो/सा बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, सदरची गाडी त्यांनी ०२ एक वर्षापुर्वी गिलबर्ड हिल, डोंगर, अंधेरी

पश्चिम, मुंबई येथील ईस्माईल यास विकलेली आहे. त्याप्रमाणे पोलीस पथकाने ईस्माईल याचा शोध घेतला असता तो गिलबर्ड हिल, डोंगर, अंधेरी पश्चिम, मुंबई येथे मिळून आला. सदर गाडीबाबत त्याला विचारणा केली असता त्याने सांगितले की सदर गाडी त्याचा मित्र नामे अनस याने त्यांच्या ओळखीच्या रितीक नावाच्या इसमास विकली आहे. सदर इसमाकडून रितीक चा मोबाईल क्रमांक प्राप्त करुन त्यांचे लोकशन काढले असता ते सुरत ,गुजरात येथे दिसून आले. त्याच प्रमाणे त्याच्या मोबाईल क्रंमाचे कॉल डिटेल्स प्राप्त करुन त्याचे तांत्रिक विश्लेषण केले असता, रितीक हा घटना घडली त्यावेळेस घटनास्थळी होता हे निष्पन झाल्यानंतर दोन पोलीस पथके अनक्रमे सुरत व वडोदरा येथे तात्काळ रवाना झाले. त्यातील एका पोलीस पथकाने सूरत बस स्टॉप, रेल्वे स्टेशन सीसीटीव्ही तपासले असता सदर तीन्ही इसम सुरत रेल्वे स्टेशनवर पुणे जयपूर या ट्रेनमध्ये चढतांना व जयपुरच्या दिशेने जातांना दिसून आले. त्यावेळी सदर गाडीचे लोकेशन तपासले असता कोटा स्थानकापासून एका तासाच्या अतरांवर असल्याचे दिसून आले, त्याअनुषंगाने मा वरिष्ठांच्या आदेशाने कोटा राजस्थान पोलीसांची संपर्क साधून त्यांच्या मदतीने सदर आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले.

कक्ष-२, गुन्हे शाखा, मुंबई. तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

अ.क्र.	पदनाम	पोलीस अधिकारी/अंमलदार नाव	बक्षिसाचा तपशिल
१	प्रभारी पोलीस निरीक्षक	दिलीप प्रल्हाद तेजनकर/कक्ष २	प्रशस्तीपत्रक
२	प्रभारी पोलीस निरीक्षक	भरत दिनकर घोने/कक्ष ६	प्रशस्तीपत्रक
३	सहा.पोलीस निरीक्षक	सचिन अर्जुन बाराते/कक्ष ५	प्रशस्तीपत्रक
४	सहा.पोलीस निरीक्षक	महेंद्र विकास पाटील/कक्ष ९	प्रशस्तीपत्रक
५	सहा.पोलीस निरीक्षक	श्रीराम भास्कर घोडके/कक्ष ९	प्रशस्तीपत्रक
६	पोलीस उप निरीक्षक	शरद बाजीराव नानेकर/कक्ष ६	प्रशस्तीपत्रक
७	पो.ह. ०३६५८	महेश मोहन मोहिते/सी.आय.यु	प्रशस्तीपत्रक
८	पो.ह. ०५०३७५	संभाजी शंकरराव बोरसे/कक्ष २	प्रशस्तीपत्रक

०२	**मालमत्ता कक्ष, गु.प्र.शा, गु.अ.वि.,** प्रकटीकरण, मुंबई	**गु.र.क्र.**१२७/२०२६ कलम ३१८(४), ३१९ (२) भा.न्या.सं. सह कलम ६६(क), ६६(ड) आय.टी.ॲक्ट.

-:'' फसवणूक (एपीके फाईल)'':-

नमुद गुन्हयात फि'त्यांचे राहते घरी येथे असताना अनोळखी मो.क्र ९४०५६६०६०९ यांने फि'ला बॅक ऑफ इंडियाचा सिनीयर मॅनेजर दिनेश कुमार असे असल्याचे भासवले व सिनिअर सिटीजन कार्ड बनवुन देतो असे सांगुन फि'चा विश्वास संपादन करून,फि'चे व्हाट्सॲप वर Senior Citizen Card Verification.APK नावाची एपीके फाईल पाठवुन त्यामध्ये फि'ची वैयक्तिक व फि'चे बॅक ऑफ इंडिया शाखेच्या डेबीट कार्डची माहीती भरण्यास भाग पाडुन फि'ची एकुण ५,६२,०००/- रु ची फसवणुक करून अपहार केला असल्याने गुन्हा नोंद.

फिर्यादी नाव/वय	:-	श्री. फकरूद्दिन मोहम्मद हुसेन प्रेसवाला, ७२ वर्षे,
चोरीस/फसवणुक मालमत्ता	:-	रू. ५,६२,०००/-
हस्तगत मालमत्ता	:-	१ CPU, ३ हार्ड डिस्क, १ Wi-Fi राऊटर, ३ मोबाईल फोन व १ पेनड्राईव्ह
आरोपी अटक नाव/वय	:-	पंकज अवधेशलाल गुप्ता
अटक दिनांक	**:-**	**दिनांक ०३/१०/२०२६**
गुन्हा कोणी उघडकीस आणला		प्रपोनि मंगेश देसाई व पथक

गुन्हा उघडकीस आणणेकरीता केलेली कामगिरी :-

१. भायखळा पोलीस ठाणे येथे दाखल सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यात ७२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकास Senior Citizen Card Verification.apk ही बनावट APK फाईल पाठवून त्यांची ₹५,६२,०००/- ची आर्थिक फसवणूक करण्यात आली होती. तपासादरम्यान फिर्यादी यांच्या **फसवणूकीच्या रक्कमेपैकी रू.३,६६,७०५.०८/- रूपये तात्काळ कार्यवाही करून** Lien **करण्यात आले आहेत.**

२. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान APK फाईलचे सखोल **Static and Dynamic Analysis** करून त्यामधील संशयास्पद Code, Permissions, Malicious Payload आणि Network Communication यांचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले.

३. Reverse Engineering च्या माध्यमातून APK मधील लपविलेल्या Code चे विश्लेषण करून त्याची कार्यपद्धती व संभाव्य Command and Control (C2) Server शी असलेला संबंध तपासण्यात आला.

४. विशेष म्हणजे, APK च्या तांत्रिक विश्लेषणादरम्यान त्यामध्ये वापरण्यात आलेला Google Firebase Project ID शोधून काढण्यात आला.

५. सदर Firebase Project ID च्या आधारे Google कंपनीशी पत्रव्यवहार करून संबंधित Firebase Project ची महत्त्वपूर्ण तांत्रिक माहिती प्राप्त करण्यात आली.

६. Google कंपनीकडून संबंधित Firebase Project ची माहिती प्राप्त करण्यात आली, ज्यामध्ये आरोपीने वापर केलेल्या ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक व डिवाईसची माहिती प्राप्त झाली.

७. ईमेल आयडीची माहिती व मोबाईल नंबर चे CDR o IPDR चे तांत्रिक विश्लेषण करून आरोपीची माहिती प्राप्त केली. व आरोपी इंदौर, मध्यप्रदेश येथे असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

८. सदर गुन्ह्याच्या सखोल तांत्रिक तपासातून बनावट APK विकसित करणाऱ्या मध्यप्रदेश राज्यातील ३६ वर्षीय सॉफ्टवेअर डेव्हलपर आरोपीचा माग काढून त्यास अटक करण्यात आली.

९. आरोपीच्या इंदौर, राज्य-मध्यप्रदेश कार्यालयावर छापा टाकून १ CPU, ३ हार्ड डिस्क, १ Wi-Fi राऊटर, ३ मोबाईल फोन व १ पेनड्राईव्ह जप्त करण्यात आले.

१०. जप्त डिजिटल उपकरणांच्या प्राथमिक तपासातून आरोपी विविध सर्व्हर सर्विस प्रोव्हायडर कंपन्यांच्या सर्व्हरचा वापर करीत असल्याचे निष्पन्न झाले.

११. तपासामध्ये आरोपीने एकूण २,८०५ Malicious APK फाईल्स तयार करून त्या इतर सायबर गुन्हेगारांच्या टोळ्यांना विक्री केल्याचे उघडकीस आले.

निष्पन्न केलेल्या APK फाईल्सचा तपशील - Senior Citizen Card Verification.apk, Pension Card

Verification.apk, Life Certificate Update.apk, Customer Support.apk, RTO Challan, Credit Card, Paytm Bank, PM Kisan, SBI Card, Union Bank, PNB, RBL, Indian Bank, AU Bank, Axis Bank, Indusiand Bank, Bank of India, Bank of Maharashtra, UCO Bank, Yono SBI, HDFC Bank, etc…

११. सदर APK फाईल्सच्या माध्यमातून देशभरातील एकूण ९,६७३ नागरिकांची फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले. आरोपीच्या Google Firebase o Hostinger अकाउंटची पाहणी केला असता त्यामधून android_events, devices, formdata ,sms_forwarding2, users असा डाटा प्राप्त झाला. त्यामध्ये ९६७३ पिडीतांचे मोबाईल क्रमांक, त्यांचे बॅंक खाते क्रमांक, एटीएम क्रमांक, सी.व्ही.व्ही क्रमांक व पिन क्रमांक व युपीआय आय.डी., संशयित सायबर गुन्हेगारांचे मोबाईल क्रमांक मिळून आलेले आहेत.

१२. यासंदर्भात सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर देशभरात १,०७४, महाराष्ट्रात १४३ व मुंबईत ३६ तक्रारी नोंद असून, त्यामध्ये सुमारे ''१५.७५ कोटींची आर्थिक फसवणूक'' झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

१३. या तपासामुळे देशभरातील ८८, महाराष्ट्रातील ८ व मुंबईतील ५ दाखल असलेले सायबर गुन्हे उघडकीस झाले आहेत.

१४. सदर तपासामध्ये Malware Analysis, Reverse Engineering, Digital Forensics o Google Firebase Investigation या प्रगत तांत्रिक पद्धतींचा प्रभावी वापर करून आंतरराज्यीय सायबर गुन्हेगारीचे महत्त्वपूर्ण धागेदोरे उघडकीस आणण्यात आले आहेत.

मालमत्ता कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

अ.क्र.	पदनाम	पोलीस अधिकारी/अंमलदार नाव	बक्षिसाचा तपशिल
१	प्रभारी पोलीस निरीक्षक	मंगेश गणपतराव देसाई	प्रशस्तीपत्रक
२	पोलीस निरीक्षक	दादा शंकर गायकवाड	प्रशस्तीपत्रक
३	सहा.पोलीस निरीक्षक	सचिन दत्तात्रय जाधव	प्रशस्तीपत्रक
४	सहा.पोलीस निरीक्षक	प्रकाश मधुकर गवळी	प्रशस्तीपत्रक
५	पो.शि.०९२१९०	मयुर मारूती थोरात (प.प्रा.सायबर पो.ठा)	प्रशस्तीपत्रक

मजकुर :-

दिनांक ०६/११/२०२६ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **"Best Conviction of the Month"** **माहे ऑक्टोबर २०२६** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणे/शाखा यांची निवड करण्यात आलेली आहे.

(ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोबर २०२६ - ०२ गुन्हे

०१	**जनरल चिटींग-३,** आगुवि, मुंबई.	**गु.र.क्र.** ८१/२०१२ कलम ४०६, ४२०, ३४ भादंवि, सह कलम ३ व ४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण (वित्तिय संस्थांमधील) कायदा १९९९.

-:'' अन्यायाने विश्वासघात सह फसवणूक '':-

नमूद गुन्ह्यातील कंपनी मे. इंडिया इमु लाईफ प्रा.लि. चे कार्यकारी संचालक हरिश दिक्षित व त्यांचे कंपनी कार्यालय भांडूप येथील कर्मचारी यांनी आपसांत गुन्हेगारी स्वरुपाचा कट व संगनमत करुन त्यांची कंपनी इमु पक्षाचे मांस व अंडी विक्री करते त्यात गुंतवणूक केल्यास दामदुप्पट-तिप्पट पैसे मिळतील असे फि' व त्यांचे पत्नीस सांगून त्यांना गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करुन त्यांनी गुंतवलिले पैसे व त्यावरील लाभ परत न करता फसवणूक केली म्हणून गुन्हा नोंद.

फिर्यादी नाव/वय	:-	श्री. वैभव संभाजी सोनावणे, वय ३६
निकाल दिनांक	:-	**२९/१०/२०२६**
अटक आरोपी नाव/वय व अटक दिनांक	:-	१) हरीष जयप्रकाश दिक्षीत अटक दि.०६/१०/२०२० २) मनोज सर्जेराव पवार अटक दि.१४/०७/२०२० ३) चेतन एकनाथ दाणे, अटक दि.१४/०९/२०२० ४) मे. इंडीयन इमू लाईफ प्रा.लि. कंपनी –
शिक्षेचा तपशील	:-	नमुद गुन्ह्यात दि. २९/१०/२०२६ रोजी मा. एमपीआयडी कायदयांतर्गत नियुक्त न्यायाधिश आणि अतिरिक्त सत्र न्यायाधिश, शहर दिवाणी सत्र न्यायालय, मुंबई कोर्ट क्र. २०, मुंबई यांनी आरोपीविरुध्द आरोप सिध्द झाल्याने त्यास **आरोपी क्र.१.** हरीष जयप्रकाश दिक्षित यांना एमपीआयडी कलम ३ अन्वये ६ वर्षे सश्रम कारावास व रु. २५,००० दंड, दंड न भरल्यास २ महिने अधिक कारावास. **आरोपी क्र.२** मनोज सर्जेराव पवार यांना एमपीआयडी कलम ३ अन्वये ६ वर्षे सश्रम कारावास व रु. २५,००० दंड, दंड न भरल्यास २ महिने अधिक कारावास. **आरोपी क्र.३.** चेतन एकनाथ दाणे यांना एमपीआयडी कलम ३ अन्वये ६ वर्षे सश्रम कारावास व रु. २५,००० दंड, दंड न भरल्यास २ महिने अधिक कारावास. **आरोपी क्र.४** मे. इंडियन इमु लाईफ प्रा.लि. कंपनीला एमपीआयडी कलम ३ अन्वये रु. ५०,००० दंड, सदरचा दंड वरील तीनही आरोपी यांच्याकडून समान भागात वसूल करणे. दंड न भरल्यास १५ दिवस अधिक कारावास..
कोणी तपास करुन दोषारोपपत्र सादर केले	:-	वपोनि. पवार व पथक

आरोपीस दोषसिध्दी होणेकरीता केलेली कामगिरी :- तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिल कारंडे यांनी मा. सत्र न्यायालय, कोर्ट क्र. २० मध्ये कोर्ट केस क्र. ११३८/२०२० अन्वये दाखल केली. यातील आरोपी हरीष दिक्षित यांनी इमु लाईफ प्रा.लि. या कंपनीत गुंतवणूक केल्यास गुंतवणूकदारांना दुप्पट ते तिप्पट आर्थिक

फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखवून मोठया प्रमाणात गुंतवणूक करुन घेतली. त्याअनुषंगाने तपासी अधिकारी यांनी गुंतवणूकदारांचे जबाब नोंदविले. त्याअनुषंगाने कागदोपत्री पुरावा हस्तगत केला. आरोपी कंपनी व आरोपी संचालक यांच्यातील सहसंबंध दाखविण्याकरिता कागदोपत्री पुरावा मा. न्यायालयात सादर केला आहे. तसेच पैरवी अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान न्यायालयात हजर राहून महत्वाचे साक्षीदार यांना साक्ष देण्याकामी मदत केली. आरोपी क्र. १ दिक्षीत हे मे. इंडियन इमु लाईफ प्रा.लि. कंपनीचे संचालक असून मुख्य आरोपी ते स्वतः असल्याबाबत कंपनीचे कागदपत्रे नोंदणीप्रमाणपत्र, ब्रोशर इत्यादी दस्तऐवज पुरावा मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. व गुन्हयाशी निगडीत साखळी उभी केली. तसेच गुन्हयातील उपलब्ध कागदोपत्री पुरावा व तोंडी पुरावा दोषसिध्दी करिता कसा लागू होतो, यासंदर्भाने आवश्यक असलेले मा. सर्वोच्य न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांचे न्यायनिवाडे मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. आरोपी क्र. २ व ३ हे कंपनीचे कर्मचारी व सहसंचालक असून त्यांनी देखील त्यांचे परिचित व्यक्तींना कंपनीबाबत खोटी माहिती देवून, गुंतवणूक केल्यास चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून, गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. त्याबाबत आरोपी व गुंतवणूकदार यांच्यातील भेटीचे पुरावे एकमेकांना परिचित असल्याचे पुरावे, पैसे गुंतविल्याचे पुरावे मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून आरोपींचा गुन्हयातील सहभाग सिध्द केला आहे. सहभाग सिध्द करण्याकरिता मा. सर्वोच्य न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांचे न्यायनिवाडे मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. आरोपी क्र. ४ ही मे. इंडियन इमु लाईफ प्रा.लि. असून कंपनीचे संचालक वरील नमूद आरोपी असल्याचे कागदोपत्री पुरावे व मा. सर्वोच्य व उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे सादर करुन आरोप सिध्द केले आहेत. मा. न्यायालयाने गुन्हयातील आरोपीतांना एमपीआयडी कलम ३ अन्वये दोषी धरुन शिक्षा सुनावली आहे. गुन्हयातील तीनही आरोपी यांना ६ वर्षे सश्रम कारावास व रु. २५,००० दंडाची शिक्षा ठोठावली असून दंड न भरल्यास २ महिने अधिक कारावास व आरोपीतांची कंपनी मे. इंडियन इमु लाईफ प्रा.लि. कंपनीस रु. ५०,००० दंड शिक्षा ठोठावली आहे.

जनरल चिटींग-३, आगुवि-१, मुंबई. तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

अ.क्र.	पदनाम	पोलीस अधिकारी/अंमलदार नाव	बक्षिसाचा तपशिल
१	वरिष्ठ पोलीस निरीक्षक	गणेश बाळासाहेब पवार	प्रशस्तीपत्रक
२	सहा.पोलीस निरीक्षक	सुनिल राजाराम करांडे	प्रशस्तीपत्रक
३	पोलीस निरीक्षक	राहुल बाबुराव कारभारी	प्रशस्तीपत्रक
४	पो.ह. ९८०७४३	विकास सुरेश म्हेत्रे	प्रशस्तीपत्रक
५	पो.शि. १८०१५४	दिगंबर चांदु सुर्यभान	प्रशस्तीपत्रक

०२	**मध्य सायबर पोलीस ठाणे** सायबर, मुंबई.	**गु.र.क्र.** १८/२०२५ कलम ३१९(२), ३१८ (४), ३(५) भा.न्या.सं. सह कलम ६६(क), ६६(ड) आय.टी.ॲक्ट.

-:''ऑनलाईन फसवणूक'':-

नमुद गुन्हयात फि' यांना अनोळखी मो.क्र. 919601671758 धारक व्यक्तीने संगणक साधनसामग्रीचा वापर करून तक्रारदार यांच्या Prince Multiplast Pvt. Ltd. कंपनीचे मालक मनिष छेडा यांचा फोटो त्याचे व्हॉटस्ॲप डिपीवर ठेऊन तो स्वत: कंपनीचा मालक मनिष छेडा असल्याचे भासवून व्हॉट्सॲप मेसेजव्दारे संपर्क साधुन New Project साठी Advance payment करायचे आहे असे कळवुन Prince Multiplast Pvt. Ltd. या कंपनीच्या खात्यातुन Marchant Name - Tajamul Akbar, ICICI Bank Ac No 773605500082, IFSC Code ICIC0007736 या खात्यात एकुण 1,98,00,000/- रूपये इतकी रक्कम RTGS मार्फत पाठविण्यास भाग पाडून फसवणूक केली म्हणून तक्रारदार यांची अनोळखी व्हॉट्सॲप मो.क्र. 919601671758 धारक व्यक्तीविरूद्ध गुन्हा नोंद.

फिर्यादी नाव/वय	:-	श्री. जयप्रकाश रविलाल राजगोर, वय ६६ वर्षे
निकाल दिनांक	:-	**१७ /१०/ २०२६**
अटक आरोपी नाव/वय	:-	१) तजमुल अकबर सोफी, वय २५ वर्षे, रा.ठि. काली बाग, बाबा रेशी रोड, बारामुल्ला, श्रीनगर, जम्मु काश्मीर १९३१०१
अटक दिनांक		दिनांक २४/०४/२०२५ रोजी १६.३० वाजता
शिक्षेचा तपशील	:-	नमुद गुन्हयात दि. १७/१०/२०२६ रोजी मा. प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी, दादर ।, मुंबई कोर्ट क्र. ६२, मुंबई यांनी आरोपीविरूध्द आरोप सिध्द झाल्याने त्यास कलम २७१ (२) बी.एन.एस.एस अन्वये व माहिती तंत्रज्ञान (IT) कायद्याच्या कलम ६६ (C) आणि (D) अन्वये ०३ वर्ष कठोर कारावयास व १ लाख रुपये दंड व दंड न भरल्यास, आरोपीला अतिरिक्त ०६ महिन्यांचा साधा कारावास भोगावा लागेल. ही शिक्षा सुनावली.
कोणी तपास करून दोषारोपपत्र सादर केले	:-	पोनि. डोरले व पथक

आरोपीस दोषसिध्दी होणेकरीता केलेली कामगिरी :- नमुद गुन्हयात फिर्यादी यांच्या कंपनीच्या बॅंक खात्यातून संपुर्ण रक्कम ज्या प्रथम लाभार्थी ICICI बॅंक खात्यात वळते करण्यात आले होते. त्यासंबंधीत बॅंक खात्याबाबत माहिती प्राप्त झाली असून ती खालीलप्रमाणे

Sr.No.	Bank Details
1	ICICI BANK , A/C No. 773605500082
2	Account Holder- Mr. Tajamul Akbar, Kanli Bagh Baba Reshi Road, Baramula, Jammu & Kashmir - India – 193101. Mob.No.- 917006224265, Email ID-
3	Fraudulent Amount- 1,98,00,000/-

वरील माहितीचे अवलोकन व तांत्रिक तपास करून CDR द्वारे लोकेशन फिक्स करून मा. वरिष्ठांना टिप्पणी अहवाल सादर करून तपासकामी श्रीनगर, जम्मु- काश्मिर येथे दि. २१/०४/२५ वेळ ०९:३० वा. अन्वये मपोउपनि जाधव व पोलीस पथक रवाना झाले होते. दि. २२/०४/२०२५ रोजी तपास पथक कटरा, जम्मू-काश्मिर येथे पोहचले असता त्याच दिवशी पहलगाम येथे पर्यटकांवर अतिरेकी हल्ला झाला असल्याने श्रीनगर व आजूबाजूचा परिसर पूर्णपणे बंद करण्यात आला होता. तरीदेखील अशा परिस्थितीत नमुद पथकाने दि.२४/०४/२०२५ रोजी गुन्हयातील पाहिजे आरोपी तजमुल अकबर सोफी याचा श्रीनगर सायबर पोलीस ठाणे व बारामुल्ला स्थानिक पोलीसांची मदत घेवुन कालीनबाग, बाबा राशी रोड, बारामुल्ला या परिसरात शोध घेतला असता तो मिळुन आला. नमुद गुन्हयाच्या अनुंषगाने चौकशी केली असता नमुद गुन्हयातील त्याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून iPhone 16 Pro, Rs- 82,000/- रोख रक्कम, ५ चेक, आधार कार्ड, Jio कंपनीचे सिम जप्त केले.

१. पोनि.रविकिरण डोरले यांनी केलेला तपास :- - मोबाईलचा Reopen पंचनामा केला. मोबाईलमध्ये आरोपीने दुसऱ-या व्यक्तीला (Jack आणि Ajit) स्वत:चे बॅंक डिटेल्स, OTP शेअर केल्याचे आणि 2.2% कमिशन म्हणजे Rs-

4,46,600/- मागितल्याचे चॅट मिळून आले.
- बँक मॅनेजर सतबीर सिंग (PW2) ने खाते आरोपीचेच असल्याचे आणि OTP ने पैसे ट्रान्सफर झाल्याचे सिद्ध केले.
- Jio Nodal Officer राकेश प्रजापती (PW5) ने मोबाईल नंबर 7006224265 आरोपीचाच असल्याचे व गुन्हा घडलेवेळीचे त्याचे लोकेशन CDR / CAF द्वारे सिद्ध केले.
- NCCRP पोर्टलवर या खात्याविरुद्ध 13 गुन्हे आधीच दाखल असल्याचे समोर आले. गुन्हयातील रक्कम 2nd layer मध्ये 27 खात्यात आणि 3rd layer मध्ये 87 बँक खात्यात वळवली गेल्याचे सिद्ध झाले.
सदर गुन्हयामध्ये फिर्यादी यांना रिटर्न ऑफ प्रॉपर्टी अन्वये 25,68,891/- रुपये त्यांच्या बँक खात्यात परत करण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

२. कोर्टापुढील मुद्दे आणि युक्तिवाद - सरकारी वकील: आरोपीच्या खात्यात थेट पैसे आले, OTP त्याच्याच मोबाईलवर आला, त्यामुळे तो जबाबदार आहे.

- बचाव पक्ष: आरोपी म्हणाला माझे खाते Mule Account म्हणून वापरले गेले. मोबाईल दुस-याला दिला होता. इलेक्ट्रॉनिक पुराव्याला 63 (4) BSA चे सर्टिफिकेट नाही त्यामुळे स्क्रीनशॉट ग्राह्य नाहीत. मालक मनीष छेडा यांना साक्षीला बोलावले नाही.

३. कोर्टाचा अंतिम निकाल कोर्टाने मान्य केले की WhatsApp च्या स्क्रीनशॉटला प्रमाणपत्र नसल्यामुळे ते पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाहीत. पण बँक स्टेटमेंट, CDR आणि थेट पैसे आरोपीच्या खात्यात आल्याचा पुरावा पक्का आहे.

मध्य सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई. तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

अ.क्र.	पदनाम	पोलीस अधिकारी/अंमलदार नाव	बक्षिसाचा तपशिल
१	पोलीस उप निरीक्षक	अक्षय वसंत मांदळे	प्रशस्तीपत्रक
२	पो.ह. ०६०६०७	जॉन डेनिस फर्नांडिस	प्रशस्तीपत्रक
३	पो.ह. ०८०७०१	मिलिंद एकनाथ हिवाळे	प्रशस्तीपत्रक
४	पो.ह. ०८१६७६	सुजय प्रकाश शेरे	प्रशस्तीपत्रक
५	पो.शि. ११३२०९	विक्रम शिवाजी बाबर	प्रशस्तीपत्रक

.....